## सोशल मीडिया

# जाहिराती व मालिका, ज्यांच्यात आहे पक्षीय प्रचाराची झलक

फेसबुक व ट्विटर वापरकर्त्यांमध्ये अलीकडे काही जाहिराती व मालिकांबाबत चर्चा झडत होत्या. अमिताभ मोदींचा प्रचार तर करत नाहीत ना? आमिरचा 'आप'शी संबंध तर नाही ना?

## 'खुशबू गुजरात की...'ला ब्रेक



**११ मार्च** | काँग्रेसचे बडोद्याचे अध्यक्ष नरेंद्र रावत यांनी गुजरात पर्यटन मंत्रालयाची जाहिरात 'खुशबू गुजरात की...'च्या नव्याने होत असलेल्या चित्रीकरणावर बंदी घालावी, अशी मागणी निवडणूक आयोगाकडे केली आहे. कारण, अमिताभ बच्चनसारख्या बड्या अभिनेत्याचा वापर भाजप विकासाचे खोटे दावे करण्यासाठी करीत आहे. नव्या जाहिरातीत अमिताभ यांचे मुस्लिम वेशभूषेतील बालिकेसोबत चित्रीकरण केले जात होते. काँग्रेसचा आरोप होता, की हा मोदी सरकारची प्रतिमा धर्मनिरपेक्ष ठरविण्याचा प्रयत्न आहे.

**परिणाम** निवडणूक आयोगाने नोटीस पाठविल्यानंतर २४ तासांच्या आत पर्यटन विभागाने हे चित्रीकरण थांबविण्याची सूचना संकेतस्थळावर प्रसारित केली. अमिताभ यांची पोटदुखी असे त्याचे कारण देण्यात आले.

## नो उल्लू बनाविंगवर प्रचंड टिचक्या

जेव्हापासून टीव्हीवर 'नो उल्लू बनाविंग...' जाहिरात सुरू झाली आहे, सोशल मीडियावर बऱ्याचशा युजर्सनी त्याचा प्रचंड वापर केला आहे. कोणी एखाद्या नेत्याच्या विरोधात, तर कोणी समर्थनार्थ...

जेव्हा केव्हा नो उल्लू बनाविंग जाहिरात पाहतो, नमोंची भाषणे आठवतात.
- **अदिती**

राहुल : काँग्रेसला या वेळी 2009 पेक्षाही अधिक जागा मिळतील. ...नो उल्लू बनाविंग, नो उल्लू बनाविंग
- **शान**

दिल्लीला उल्लू बनवले, आता पूर्ण देशाची पाळी. फारच क्रांतिकारी, फारच क्रांतिकारी...
- सात्विक पटेल

कमळावर बसली लक्ष्मी, सुख समृद्धी येईल दारी, काँग्रेसने बसवले उल्लूवर जे घेऊन उडून जाईल भुर्रकन्..
- **अलका**

## पीपल

### राहुल गांधींना आव्हान देण्यासाठी सज्ज स्मृती इराणीचे काही अज्ञात पैलू

# एकेकाळी हॉटेलात फरशी पुसली



**तीन** मुलींचे पिता एकदा घरी परतले तेव्हा त्यांच्यासोबत ज्योतिषीदेखील होते. त्यांना तिघांच्या भविष्याबद्दल सांगण्याची विनंती केली. ज्योतिषी म्हणाले, लहान दोघांचे ठीक आहे. मात्र मोठ्या मुलीचे काही नाही होऊ शकत. हे तीव्र शब्द मोठ्या मुलीला झोंबले. खाडकन म्हणाली, जा. मीही इथेच आहे. तुम्हीदेखील इथेच आहात. दोघे बघूया. ज्योतिष्याबद्दल माहीत नाही, मात्र मोठ्या मुलीबद्दल राहुल गांधींच्या विरोधात भाजपची उमेदवार म्हणून उतरवण्याची चर्चा आहे. भेटूया, तीच आहे स्मृती इराणी. अनेक वर्षांपासून टीव्हीद्वारे घराघरात आदर्श सुनेच्या रूपात पोहोचलेली स्मृती भाजपची आक्रमक उपाध्यक्ष म्हणून ओळखली जाते.

### ग्लॅमरपूर्वी तीव्र संघर्ष

- पंजाबी पिता आणि आसामी आईची मुलगी स्मृतीचा जन्म दिल्लीत २३ मार्च १९७६ रोजी झाला. वडील कुरिअर कंपनी चालवत होते. कौटुंबिक स्थिती ठीक नसल्याने शाळेनंतर बाहेरून बी. ए. पूर्ण केले.
- **स्मृतीने दिल्लीत घरोघर फिरून ब्यूटी प्रॉडक्ट्सचे मार्केटिंग केले. कोणी तरी मुंबईला नशीब अजमावण्याचा सल्ला दिला.**
- स्मृती मुंबईत आली. १९९८ मध्ये मिस इंडियासाठी ऑडिशन दिली. निवड झाली. परंतु वडिलांनी त्यात भाग घेण्यास नकार दिला. आईने साथ दिली. स्मृतीला दोन लाख रुपयेही पाठवले. स्पर्धेच्या फायनलला पोहोचली. जिंकली नाही.
- **पैसे परत करण्यासाठी नोकरी शोधू लागली. जेट एअरवेजमध्ये फ्लाइट अॅटेंडंट पदासाठी अर्ज केला. निवड झाली नाही. अनेक मॉडेलिंग ऑडिशनमध्ये रिजेक्ट झाली. अखेर मॅकडोनाल्ड जॉइन केले. तीन महिने वेट्रेस म्हणून काम केले. फरशी पुसली.**

### टीव्हीवरही सुरुवातीला नाकारली गेली

'क्योंकि सॉंस भी कभी बहू थी'च्या ऑडिशनसाठी स्मृती गेल्यावर एकता कपूरच्या टीमने तिला नाकारले. मात्र एकताला स्मृती भावली. सर्वांचे मत बाजूला सारून ती म्हणाली, 'ही तुलसी विराणी होईल.'

- **२००० ते २००७ तुलसीच्या भूमिकेतील स्मृतीला लागोपाठ सात वर्षे इंडियन टेलिव्हिजन अकॅडमीने उत्कृष्ट अभिनेत्रीचा पुरस्कार दिला. हा एक विक्रम आहे.**

### परिवार

- जानेवारी २००१ मध्ये स्मृतीने आपल्यापेक्षा दहा वर्षे मोठ्या झुबीन इराणीशी लग्न केले. याच वर्षी तिने जोहर (मुलगा) आणि २००३ मध्ये मुलगी जोएसला जन्म दिला. झुबीनला पहिली पत्नी मोनापासून शॅनेल नावाची मुलगी आहे. मोना आणि स्मृती चांगल्या मैत्रिणी आहेत.



**वाद** एका वृत्तवाहिनीवरील चर्चेत काँग्रेस खासदार संजय निरुपम यांनी स्मृतीवर आपल्या मैत्रिणीचे घर उद्ध्वस्त केल्याचा आरोप केला होता. ज्यावर भाजप नेत्यांनी अनेक दिवस निरुपमशी कोणत्याच प्रकारच्या चर्चेत भाग घेतला नाही.

### ...आणि भाजपला अगोदर विरोध केला

नरेंद्र मोदी यांच्याविरुद्ध उपोषण करण्याची धमकी दिली होती. आज आहे मोदींची सर्वात विश्वासू..

- २००२ मध्ये गुजरात दंगलीनंतर स्मृतीचा मोदींना उघड विरोध. तेव्हा ती राजकारणात नव्हती. मोदींनी गुजरातचे मुख्यमंत्रिपद न सोडल्यास आमरण उपोषण सुरू करणार असा इशाराही दिला. मात्र तसे काही झाले नाही.
- **२००३ मध्ये तिचा भाजपात प्रवेश**
- २०१३ मध्ये एका वृत्तवाहिनीला दिलेल्या मुलाखतीत स्मृतीने स्पष्ट केले की, माध्यमांच्या उलटसुलट बातम्या पाहून मोदींच्या विरोधात गेले होते. मात्र जेव्हा गुजरातच्या लोकांना भेटले, तेव्हा स्थिती स्पष्ट झाली.
- **स्मृतीच्या या मुलाखतीचा यू-ट्यूबवर शेअर्ड व्हिडिओ सुमारे ७५००० लोकांनी पाहिला.**
- स्मृती २००४ मध्ये चांदनी चौकातून कपिल सिब्बल यांच्याविरुद्ध निवडणूक हारली. भाजप राष्ट्रीय कार्यकारिणी सदस्य झाली. गुजरातमधून सध्या राज्यसभेत आहे.

## प्रचार रंग

### वाराणसीत सध्या होतेय दुसऱ्या नरेंद्रची चर्चा



वाराणसीमध्ये नरेंद्र मोदी उमेदवारी करणार हे स्पष्ट होताच, त्यांच्या समर्थकांमध्ये गतवर्षी प्रसिद्ध करण्यात आलेल्या 'काशी जर्नल ऑफ सोशल सायन्सेस'ची मागणी अचानक वाढली. उमेदवारी जाहीर होताच त्याच्या झेरॉक्स काढण्यात आल्या. मात्र त्यात मोदींबाबत काहीही छापण्यात आलेले नाही. त्यातील मजकूर स्वामी विवेकानंदांबाबत आहे. बनारस विश्वविद्यालयातील प्रा. कौशल किशोर मिश्रा त्याचे संपादक आहेत. परंतु भाजप समर्थक त्याचा संबंध मोदींशी जोडत आहेत. त्यातील लेखानुसार विवेकानंद १८८९ मध्ये येथे येऊन पंडित मदन मोहन मालवीय यांना भेटले होते. लोक त्यांना प्रेमाने नरेंद्र म्हणत. मिश्रा म्हणतात वारणसीला येऊन गेल्यानंतर ते जगप्रसिद्ध झाले. मोदी समर्थक म्हणतात, अशाच रितीने मोदीही आता इतिहास घडविणार आहेत.

### 'जायंट किलर' ठरले तर ठिक, नाही तर?



भाजपमध्ये यावर विचारमंथन सुरू आहे, की सोनिया गांधींच्या विरोधात उमा भारती आणि राहुल गांधींच्या विरोधात स्मृती इराणी यांना रिंगणात उतरवावे. उद्देश आहे, त्यांना कडवे आव्हान देण्याचा. परंतु उमा आणि स्मृती काँग्रेसच्या या सर्वोच्च नेत्यांविरोधात लढण्यास तयार आहेत का? सूत्रांच्या माहितीनुसार उमा तयार आहेत. मात्र पराभूत झाल्यास त्यांना राज्यसभा सदस्यत्व हवे आहे. ते शक्य नसल्यास त्यांना रायबरेली व झाशी अशा दोन्ही ठिकाणहून लढण्याची परवानगी द्यावी. त्यास पक्ष तयार झाल्यास मोदींनंतर दोन जागांवर लढणाऱ्या त्या पक्षाच्या दुसऱ्या नेत्या असतील. राहिल्या स्मृती इराणी, त्या राज्यसभा सदस्य तर आहेतच. त्यामुळे हरल्या तरी त्या खासदार राहतीलच. जिंकल्या तर 'जायंट किलर' ठरतील. आता पक्ष जो आदेश देतील, त्याचे ते निश्चितच पालन करतील.

### महाराष्ट्रात काँग्रेसचे 'आदर्श' स्टार प्रचारक



महाराष्ट्राचे माजी मुख्यमंत्री अशोक चव्हाण यांचा बचाव खुद्द काँग्रेसाध्यक्षा सोनिया गांधी यांनी केला. त्यामुळे पक्षाची दारे त्यांच्यासाठी खुली झाली आहेत. नांदेडहून उमेदवारी करण्याबरोबरच त्यांचे नाव काँग्रेसच्या स्टार प्रचारकांच्या यादीतही सामिल करण्यात आलेले आहे. पक्षाच्या धुरंधरांचे मत आहे की, भाजपने काँग्रेसच्या काही मोठ्या नेत्यांना पक्षात घेतले नसते, तर चव्हाण यांना नांदेडमधून तिकिट मिळणे शक्य नव्हते. काँग्रेस नेत्यांचा असाही तर्क आहे, की, भ्रष्टाचार व अराजकतेच्या मुद्यावर विरोध करणारा भाजप जेव्हा निवडून येऊ शकणाऱ्या उमेदवारांना फोडण्याच्या प्रयत्नात आहे, तेव्हा आपल्या ताकदवान नेत्यांचा बळी काँग्रेसने का द्यावा. मतितार्थ- केवळ कयासांच्या आधारावर काँग्रेस दिग्गजांना नाकारणार नाही.

रिपोर्ट : सुजीत ठाकूर

### ह्यूमर

देव जग संपविण्याचा निर्णय घेतो. याबाबतची माहिती सर्वांपर्यंत पोहोचविण्यासाठी देव तीन ताकदवान व्यक्तींना बोलावतो. आता पाहा ही माहिती सर्वांपर्यंत कशी पोहोचली ते-

१. ओबामा (सर्वांत शक्तिशाली देश अमेरिकेचे अध्यक्ष)- एक चांगली बातमी आहे व एक वाईट बातमी आहे. चांगली बातमी ही, की देव आहे व वाईट ही, की तो जग नष्ट करणार आहे.

२. शी जिंगपिंग (सर्वांत जास्त लोकसंख्या असलेल्या चीनचे राष्ट्रपती)- एक वाईट बातमी आहे व एक अतिवाईट बातमी आहे. वाईट बातमी ही, की आपण चुकत आहोत, देव आहे. अतिवाईट ही, की तो जग नष्ट करणार आहे.

## भास्कर विशेष | एडीआर-दक्ष सर्वे

**या सर्वेमध्ये लोकसभेच्या ५२५ जागांसाठी अडीच लाख मतदारांची मते जाणून घेण्यात आली. एडीआरचा दावा आहे, की हा देशातील सर्वात मोठा सर्वे आहे. प्रत्येक मतदारसंघात ५०० जणांना प्रश्न विचारण्यात आले. जाणून घ्या, निवडून दिलेल्या खासदारांप्रति राज्यनिहाय जनता किती संतुष्ट आहे...**

## गुजरात

# २ माजी मुख्यमंत्रीपुत्र, १ सर्वात पुढे, १ सर्वात मागे

मतदारांनी सरासरी म्हणजे **10** पैकी **6** गुण प्रत्येक खासदारला दिले, मध्यप्रदेशात फक्त **2** खासदारांनाच **5** गुण प्राप्त झाले होते...

### का होते मतदान?

- पक्षासाठी
- उमेदवारासाठी
- जात आणि धर्मासाठी
- पंतप्रधानपदाची दावेदारी
- भेटवस्तूंसाठी




- लोकांनी गुन्हेगार उमेदवारांना मते द्यावीत का ?

27% हो असे उत्तर देणारे मतदार
73% नाही असे म्हणणारे लोक

गुजरातमध्ये मतदानाची पद्धती वेगळी आहे. येथे उमेदवारापेक्षा जास्त महत्त्व पक्षाला आहे. जात आणि धर्माच्या आधारे होणारे मतदानही जास्त आहे. त्यापाठोपाठ पंतप्रधानपदाचा उमेदवार पाहून मतदान करणाऱ्यांची संख्या आहे. गुजरातमध्ये २६ पैकी २५ मतदारसंघांमध्ये झालेल्या सर्वेत सर्वच खासदारांची कामगिरी सरासरीइतकी असल्याचे संकेत मिळाले. सर्वाधिक म्हणजे १० पैकी ६.९२ गुण बारडोलीतील काँग्रेस खासदार तुषार चौधरींना मिळाले. ते माजी मुख्यमंत्री अमर सिंह यांचे पुत्र आहेत. सर्वात कमी गुण आनंदमधील काँग्रेसचे खासदार भरत सोळंकी यांना मिळाले. ते माधवसिंह सोळंकींचे पुत्र आहेत. कोणत्याही खासदाराचे सरासरी गुण ६.०९ पेक्षा कमी नाहीत. म्हणजेच खराब कामगिरी कोणाचीच नाही.

### सर्वाधिक गुण मिळविले यांनी



रोजगार, वाहतुकीसाठी यांनी केलेले कार्य लोकांना सर्वाधिक चांगले वाटले

पण शैक्षणिक सुविधा आणि रुग्णालयांच्या मुद्यांवर ते लोकांची अपेक्षापूर्ती करू शकले नाहीत.

रोजगारासाठी: 10 पैकी 9.19 नंबर
सार्वजनिक वाहतूक: 8.12 गुण
शिक्षण सुविधांना: 10 पैकी 4.94
रुग्णालयांसाठी: 4.64 गुण

**तुषारभाई चौधरी**, बारडोली 6.92



लालकृष्ण अडवाणी, गांधीनगर
१० पैकी ६.७६ गुण दिले मतदारांनी

### सर्वात कमी गुण मिळाले काँग्रेसच्या खासदाराला

रोजगारनिर्मिती, वाहतूक आणि रस्त्यांच्या मुद्यांवर लोकांची अपेक्षा पूर्ण झाली नाही.

रुग्णालये आणि शाळांच्या मुद्यांवरही पिछाडीवर

चांगले रोजगार: 6.46
सार्वजनिक वाहतूक: 6.43
रुग्णालय: 5.89
शाळांसाठी: 5.96



**भरतभाई सोळंकी**, आणंद 6.09

काँग्रेस:

| प्रभा तवियाड | विक्रम माडम | किशन पटेल | कुंवर जी भाई | सोमा पटेल |
|---|---|---|---|---|
| दाहोद | जामनगर | बलसाड | राजकोट | सुरेंद्रनगर |
| 6.81 | 6.74 | 6.74 | 6.72 | 6.57 |

0 – 6 खराब | 6 – 7 ठीक | 7 – 10 चांगले

**6.32 दिनशा पटेल**, खेडा

- २००९ मध्ये पाटण्यातून काँग्रेसचे खासदार झालेले जगदीश ठाकोर आता रिंगणात नाहीत. सर्वेत त्यांना १० पैकी ६.४४ गुण.
- २००९ मध्ये विजयी पाच जणांना भाजपने तिकीट दिलेले नाही. ते आहेत अहमदाबाद पूर्वतील हरिन पाठक, कच्छतील पूनम जाट, जुनागडचे दीनू बोधा, साबरकांठातील महेंद्र सिंह व बडोद्यातील बालकृष्ण शुक्ला.

### काही अपेक्षा पूर्ण, काही बाकी

चांगली रोजगारनिर्मिती: 10 पैकी 9.13 गुण प्राप्त

सर्वाधिक काळ दिल्लीतच वास्तव्य. तरीही मतदारांच्या अपेक्षापूर्तीचे निकष केले आहेत पूर्ण

महिलांची सुरक्षा: 8.22 गुण

**तरीही आहेत या समस्या**

यांच्या मतदारसंघातील लोकांना वाटते की, शाळा, रुग्णालये याबाबत ते अपेक्षापूर्ती करू शकले नाहीत.

रुग्णालयांसाठी १० पैकी प्राप्त: 4.68 गुण

शाळांसाठी १० पैकी: 5.06 गुण

भाजप:

| राजेंद्र राणा | प्रभात सिंह | जयश्री पटेल | हरिभाई चौधरी | दर्शना जारदोश |
|---|---|---|---|---|
| भावनगर | पंचमहाल | मेहसाणा | बनासकांठा | सुरत |
| 6.87 | 6.82 | 6.77 | 6.61 | 6.66 |

| विठ्ठल रादड़िया | मनसुख वसावा | रामसिंह राठवा | किरीट सोळंकी | नारण काचडिया |
|---|---|---|---|---|
| पोरबंदर | भरूच | छोटा उदयपूर | अहमदाबाद(प) | अमरेली |
| 6.83 | 6.57 | 6.56 | 6.56 | 6.56 |

पाथरकर सरांची श्रीयश अॅकॅडमी
विद्यार्थ्यांच्या 100% यशाची, गुणवत्तेची गुरुकिल्ली!!
Higher English | Semi- English | मराठी माध्यम
Batch A→ From 31th April
Batch B→ From 15th April
* Maths, Science, English
* Special Batch For All Subject (Only 45 Students.)
इ. १० वी वार्षिक परीक्षा संपलेल्या विद्यार्थ्यांसाठी १८ मार्चपासून बॅच सुरू
इ. 10 वी प्रवेश सुरू
इ. 8 वी मध्ये $A_1$/$A_2$ श्रेणी घेऊन उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांना फिमध्ये सवलत.
• Time •
Batch - 1
6.30 am to 10.15 am
Batch - 2
4 pm to 8 pm